# एम्.डी. ( आयुर्वेद ) एन्ट्रन्स परीक्षा ः संधी , तयारी , उपयुक्तता व भविष्य.

लेखक ः वैद्य हृषीकेश बा.म्हेत्रे.पुणे, M.D.[Aayurveda] (Jamnagar), M.A.(Sanskrit)
9422016871, www.MhetreAyurved.com, MhetreAyurved@yahoo.co.in

❖ संधी ः महाराष्ट्र ः महाराष्ट्रातील एम्.डी.एन्ट्रन्स 2003 पासून सुरू झाली आहे.आगामी परीक्षा मार्च ते जून 2010 मध्ये अपेक्षित आहे. या परीक्षेस 1st Round पर्यन्त ज्यांची इन्टर्नशिप संपते असे विद्यार्थी पात्र होतील.महाराष्ट्रात 15 कॉलेजमधून 16 विषयांसाठी सुमारे 200 जागा उपलब्ध आहेत. पैकी 80% जागा विद्यार्थ्यांसाठी आहेत.अद्ययावत् माहितीसाठी त्या त्या वर्षीचे फॉर्म व प्रॉस्पेक्टस पहावे.or visit website : ayurvedinstitute.com

❖ **महाराष्ट्राबाहेर** ः राष्ट्रीय स्तरावर जामनगर (गुजरात) , जयपुर (राजस्थान) , BHU (वाराणसी, उ.प्र.) येथे सर्व विषयांकरिता एकूण 15 ते 25 तर त्रिवेन्द्रम, हैदराबाद, अहमदाबाद, रायपुर, पुरी, उदयपुर, कलकत्ता, लखनौ येथील राज्यस्तरीय पीजी सेन्टर्समध्ये काही निवडक विषयांकरिता एकूण 2 ते 6 जागा उपलब्ध आहेत.पैकी अहमदाबाद येथील जागा जामनगर एन्ट्रन्सद्वारेच भरल्या जातात.बाकी सर्व ठिकाणी स्वतंत्र एन्ट्रन्स एक्झाम होतात व त्या परीक्षा त्या त्या ठिकाणी जाऊन द्याव्या लागतात.गत २ वर्षापासून जामनगर जयपुर यांची Common Entrance झाली आहे.सर्वच इन्स्टिट्यूट्समध्ये त्या त्या राज्याकरिता 50 % जागा राखीव आहेत.हैदराबाद एन्ट्रन्सद्वारेच विजयवाडा येथील तर त्रिवेन्द्रम एन्ट्रन्सद्वारेच कोइक्कल, कुन्नूर व एर्नाकुलम् येथील जागा भरल्या जातात.या परीक्षांसाठी इंटर्नशिप ही साधारणतः 31 जुलै पर्यन्त किंवा एक्झाम डेट पर्यन्त संपावी लागते.सर्व इन्स्टिट्यूट्समध्ये काही जागा विषयवार रोटेशन पद्धतीने मागासवर्गासाठी राखीव आहेत. BHU, जामनगर, जयपुर यांच्या एन्ट्रन्स गेली कित्येक वर्षे जूनच्या अखेरीस किंवा जुलै प्रथम सप्ताह या काळात एकामागे एक होतात.अन्य सर्व इन्स्टिट्यूट्सच्या एक्झाम डेट्स् या अनिश्चित असतात.या सर्वांची माहिती त्या त्या वेळी राष्ट्रस्तरीय वर्तमानपत्रे (टाईम्स , एक्स्प्रेस) , रोजगार समाचार (Employment News) यांत प्रसिद्ध होते. शिवाय पुढील वेबसाईट्स् पाहाव्यात.

बीएचयु. bhu.ac.in, जयपुर nia.nic.in, जामनगर ayurveduniversity.com, केरळ cee-kerala.org, कर्नाटक rguhs.ac.in

❖ तयारी ः अभ्यासाची ः महाराष्ट्र एन्ट्रन्सचा मागील 8 वर्षाचा अनुभव पाहता या परीक्षातील प्रश्न थोडे सोपे असतात महाराष्ट्राबाहेरील परीक्षांचे तुलनेत.शिवाय निगेटीव मार्किंग नसते.महाराष्ट्राबाहेर मात्र 1/4 ते 1 इतके निगेटीव मार्किंग आहे.म्हणजे 10 उत्तरांपैकी 5 बरोबर व 5 चूक असतील तर स्कोअर 'शून्य' होतो.सर्वच प्रश्न MCQ या प्रकारचे असतात.काही ठिकाणी निगेटीव्ह मार्किंगची पद्धत बंद झाली आहे.प्रश्नपत्रिका हिंदी व इंग्रजीत असते.महाराष्ट्रात मराठीतही असते.प्रश्नांची संख्या महाराष्ट्राबाहेर 120 किंवा 80 आहे.महाराष्ट्रात ती 250 आहे.कोणत्या विषयाचे किती प्रश्न विचारणार हे महाराष्ट्रात ठरवून दिलेले आहे.महाराष्ट्राबाहेर मात्र विषयवार प्रश्नसंख्या निश्चित नाही.BAMS च्या 3 ही परीक्षांचे मूल्यमापन करून काही Career मार्क देण्याची ही पद्धत आहे.मॉडर्नचे प्रश्न विचारले जातात पण ते बरेच सुपरफिशियल असतात.महाराष्ट्रात तर बीपीची नॉर्मल व्हॅल्यू किंवा ब्लड ग्रुप असेही प्रश्न होते.त्यांचे प्रमाण कधीच 20 % पेक्षा अधिक नसते.एकही मॉडर्न प्रश्न न सोडवता सिलेक्ट झालेले विद्यार्थी मला माहीत आहेत.महाराष्ट्राबाहेर कोणत्याच परीक्षेचा पॅटर्न असे काही नसते.तिथले कोणतेच पेपर कधीच बाहेर परीक्षेनंतर उपलब्ध होत नाहीत.तसे कुणी छापत असेल तर ती फसवणूक होय.अमुक विषय किंवा ग्रंथ याला प्राधान्य असेही काही नसते.कुठेही 'सीट मॅनेज' होत नाहीत.उलट उत्तरपत्रिका तुमच्या हाती घरी परत दिलेली असते आणि 'आन्सर की' इन्टरनेटवरून प्रसिद्ध होते.तुम्ही आक्षेप नोंदवू शकता.इतकी पारदर्शकता असते.ज्या विद्यार्थ्याला कॉलेजमध्ये कुणी ओळखतही नसते असेसुद्धा विद्यार्थी राष्ट्रस्तरावर प्रथम क्रमांकाने सिलेक्ट झालेले आहेत.त्यामुळे नाही त्या शंका घेऊ नयेत.प्रायः विद्यार्थी बाजारात उपलब्ध रेडिमेड MCQ पुस्तके घेऊन अभ्यास करतात.पण ही पद्धत तितकी योग्य नव्हे कारण तयार प्रश्न सोडवण्यापेक्षा विविध प्रकारचे प्रश्न ज्या 'डाटाबेस'च्या आधारे निर्माण होऊ शकतात तो 'डाटाबेस ' तयार' करणं हे महत्त्वाचं होय.कारण एका ओळीवर सुद्धा डझनावरी प्रश्न तयार करता येतात.

उदा. 'वयोऽहोरात्रिभुक्तानां तेऽन्तमध्यादिगाः क्रमात्' किंवा 'तत्राद्या मारुतं घ्नन्ति' या ओळींवर कितीही प्रश्न शक्य आहेत.किंवा एकदा 'गुरू'च्या विपरीत 'लघु' हे कळले की त्याच पद्धतीने अमुकच्या विपरीत तमुक असे 20 गुणांचे 40 प्रश्न तयार झाले पण 'तीक्ष्ण' गुणाच्या विपरीत 'मंद' व 'मृदु' अशी 2 उत्तरे संभवतात हे संहिताच्या मूलभूत व परस्परतुलनात्मक अभ्यासाविना शक्य नाही.किंवा सगळे येत असूनही प्रश्नशैली ज्ञात नसलेने वात व पित्त यांचे कॉमन स्थान किंवा गुण सांगा याचे उत्तर पटकन् देता येत नाही.अगदी 'देश' किती असतात किंवा वाग्भटांनी उल्लेखिला पण चरकसुश्रुतांनी नाही असा अधारणीय वेग कोणता किंवा सुश्रुतसंहितेच्या प्रथमोऽध्यायाचे नाव सांगा या सरळ प्रश्नांची उत्तरेसुद्धा संहिताचा मूळ अभ्यास नसलेने देता येत नाहीत.द्रव्यगुणातील लॅटिन नेम फॅमिली नेम किंवा इतिहासातील ग्रंथ व लेखक यांची संगती किंवा विविध कल्प व त्यांचे रोगाधिकार या बाबींचा विचारच केलेला नसतो.जरी MUHS नाशिक यांनी MCQचा अंतर्भाव परीक्षांत केला असला तरी inter-subject or inter-year प्रश्न सोडवणे हे अवघड जाते.महाराष्ट्रापुरते जरी मराठी Text बुक्स काहीशी उपयोगी असली तरी महाराष्ट्रबाहेरच्या एन्ट्रन्ससाठी ती पुरेशी ठरत नाहीत.महाराष्ट्रबाहेरच्या राष्ट्रीय परीक्षा या उत्तरभारतात होत असलेने हिंदी पुस्तके अधिक उपयुक्त होत.विशेषतः ज्या विषयांचा संहितांमध्ये विषयांश सापडत नाही त्यांचेबाबत म्हणजे इतिहास पदार्थविज्ञान रसशास्त्र भैषज्यकल्पना द्रव्यगुण द्वितीयभाग.अर्थात् ज्या विषयांचे मूळ संदर्भ संहितांतून आहेत ते विषयांश तिथूनच वाचणे श्रेयस्कर कारण मूळ संदर्भाला सर्वाधिक महत्त्व अजूनतरी आहे.शक्यतो रेडिमेड नोट्स् (मुद्रित पुस्तकस्वरूपातील किंवा सिनीयर मित्र यांच्या) वापरू नयेत कारण त्या तुमच्या बुद्धिला अनुसरून काढलेल्या नसतात.आपला स्वतःचा वैयक्तिक 'फर्स्ट हॅन्ड' 'डाटाबेस' स्वतःच्या हस्ताक्षरात स्वतः 'तयार' करावा.हाच 'कस्टमाईज्ड् पर्सनल टेलरमेड 'ओरिजिनल' डाटाबेस सर्वाधिक उपयुक्त असतो.अर्थात् आत्मविश्वास वाढवणेसाठी अभ्यास पूर्ण झाल्यावर 'रेडिमेड' बाजारी पुस्तकांचा 'नेट प्रॅक्टीस' म्हणून उपयोग नक्की होऊ शकतो.पण जर मुळातच अभ्यास नसेल तर अशा रेडिमेड फूडचा उपयोग फार होत नाही कारण 'MCQ प्रश्न' हे अभ्यासाचे 'कार्य' आहे 'समवायि कारण' नव्हे.त्यामुळे 'इफेक्ट'कडून 'कॉज'कडे असा प्रवास करणे म्हणजे उलटी तैराकी होय त्यात दमछाक जास्त होते.नुसतेच तयार प्रश्न व त्यांची तयार उत्तरे यातून सुपिरिऑरिटी किंवा इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स आल्याची उदाहरणे मी पाहिली आहेत.त्यामुळे It is not important to solve 'many' MCQs, but it is necessary to prepare to solve 'ANY' MCQ! Don't u agree? शिवाय एन्ट्रन्सला जाताना मध्ये इन्टर्नशिपचे 1 वर्ष गेलेले असते.त्यामुळे अगदी थर्ड इयरचेसुद्धा तपशील आठवत नाहीत तिथे ऐतिहासिक काळी दिलेल्या द्वितीय वर्ष व पौराणिक काळी दिलेल्या प्रथम वर्षातील विषयांचे बारीक तपशील आठवणे जास्तच अवघड जाते.संपूर्ण साडेचार वर्षाचा आयुर्वेद व मॉडर्न अभ्यास तपशीलाने minute details आठवणे नक्कीच दुष्कर आहे.अर्थातच आपली बुद्धीची कुवत व आपण अभ्यासाला देऊ इच्छिणारा कालावधी (एकूण व दिवसाकाठी) यांचे गणित जमले पाहिजे.केवळ उपलब्ध छापील पुस्तके वाचून हा अभ्यास होत नाही.यासाठी 'जिवंत' Live प्रशिक्षणाचीच आवश्यकता असते.म्हणूनच यासाठी 'एका विशिष्ट' टेक्निकची आवश्यकता असते.याच अभ्यासाच्या जोरावर UPSC MPSC परीक्षाही देता येतात.

❖ आमची पद्धत ः

❖ मुळातच एन्ट्रन्ससाठीचा अभ्यास 'कसा करावा' (How to do & Target setting) याचे सर्वांगीण व यशोगामी मार्गदर्शन देणारी व 'तो अभ्यास 'तसा करवून' (Target Execution) घेणारी' यंत्रणा जवळपास भारतभरात अस्तित्वात नव्हती.त्यामुळेच 1999 पासून आम्ही जे असे प्रयत्न यासाठी 'एकहाती (One Man Show)' करीत आहोत , त्या प्रयत्नांना 'उत्साहवर्धक यश' व 'देशभरातून विद्यार्थ्यांचा प्रतीसाद' लाभत आहे.यावर्षी आम्ही 13 वे वर्ष साजरे करत आहोत.आम्ही चालवत असलेल्या MD Entrance Preparation कोर्समध्ये 22 सेशन्स आहेत.पहिल्या सेशनला अभ्यासाचा एकूण आवाका आणि तो अभ्यास पूर्ण करण्याची पद्धत समजावून (Explanation of the Method for MCQ Hunting!) सांगितली जाते.त्याच वेळी पुढील सेशनचा पोर्शन Declare केला जातो.त्याच्या अभ्यासाची GuideLine दिली जाते.त्यानुसार विद्यार्थ्यांनी अभ्यास करायचा.पुढच्या सेशनसाठी आलेवर काही न बोलता Decided Portionवर MCQ Paper दिला जातो.तो सोडवलेवर 2 प्रकारचा Confidence येतो.ज्याअर्थी आपल्याला प्रश्न बरोबर Poitive Mark सोडवता आले त्याअर्थी आपण एवढा अभ्यास नीट केला आहे.उलट प्रश्न Attempt करता न येणं म्हणजे सदर भागाचा अभ्यास केला नाही किंवा करूनही विसरला.आणि प्रश्नाचे उत्तर चूक Negative Mark येणं म्हणजे Over-Confidence … येत नसताना अंदाजे जुगार खेळणं.आपल्या अभ्यासाचा दर्जा असा पेपर सोडवून लक्षात आला की मग आम्ही संपूर्ण Decided Portion 'LINE TO LINE' Diccuss करतो.त्सोबत त्या त्या सेशनची Key Note असतेच.यामुळे विद्यार्थ्यांचा NO LINE is Missed असा अभ्यास होतो.दर पुढच्या सेशनला Portion संसर्जनक्रमाप्रमाणे थोडा थोडा वाढतो.प्रत्येक पुढच्या सेशनमध्ये विद्यार्थ्यांचा दर्जा सुधारतो.अधिकाधिक MCQ Attempt करण्याचा Confidence येतो आणि Maximum Positive Mark मिळवतो व Negative Mark टाळतो.प्रत्येक सेशनला MCQ Paper असतोच शिवाय दर 2 सेशननंतर पहिल्यापासून त्या सेशनपर्यन्तच्या Portion वर Cummulative Paper असतात जसे 2 to 4, 2 to 6, … 2 to 18 & 2 to20. शिवाय शेवटी 250 MCQचे 6 Revision Paper असतात.आयुर्वेद व मॉडर्न यांची प्रत्येकी 1000 Ques Bank with Answers दिली जाते. शिवाय कोर्स संपल्यानंतर प्रत्यक्ष एन्ट्रन्स परीक्षा होईपर्यन्त Test Series चालवली जाते.म्हणजे अभ्यास्यात खंड न पडता अखंड Revision चालू राहते.Keep No Stone UNTURNED! अशी आमची अभ्यासाची पद्धत आहे.त्यामुळे एन्ट्रन्ससाठी आवश्यक असा आयुर्वेदीय संहिता.संहितात नसणारे आयुर्वेदीय विषय जसे पवि.इतिहास.रस.भैषज्य.द्रव्यगुण वनस्पती व आवश्यक ते Parallel Modern, MCQ Market Books, Text Books, General Info हा 4 ½ वर्षाचा अवाढव्य Portion; विद्यार्थ्यांना 'Comfortably & Confidently' digest होतो याची आम्ही शाश्वती देतो.

❖ शिवाय **आवश्यक त्या इतर सर्व Printed Notes ही देतोच. होय, आवश्यक त्या इतर सर्व Printed Notes ही देतोच.**

❖ Postal Course ः मागील ५ वर्षापासून आम्ही महाराष्ट्र आणि देशभरातील विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेऊन Postal Course देखील सुरू केला आहे.त्याला विद्यार्थ्यांचा मिळणारा प्रतिसाद अतिशय उत्साहवर्धक असून या Postal Courseचीही आवश्यकता व उपयुक्तता सिद्ध झाली आहे. आतापर्यन्त तब्बल 200 हून अधिक विद्यार्थ्यांनी या Postal Courseचा लाभ घेतला आहे.

❖ आजपर्यन्त आम्हाला मिळालेले यश ः मागील 12 वर्षात आम्ही सुमारे 1500 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे.त्यातून 92 विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर तर सुमारे 265 विद्यार्थी महाराष्ट्र एन्ट्रन्सला सिलेक्ट झाले आहेत.11 वर्षात 8 वेळा आमचे Students Topper Rank No. 1 आले आहेत.यंदा महाराष्ट्रात ३७ तर जामनगर जयपुर येथे ६ आणि BHU येथे १ व त्रिवेन्द्रम येथे ४ विद्यार्थी सिलेक्ट झालेत.आज महाराष्ट्राच्या प्रत्येक पीजी इन्स्टिट्यूटमध्ये आमचा विद्यार्थी आहे.इतकेच नव्हे तर मागील 11 वर्षात जितके स्टुडंट्स् राष्ट्रस्तरावर महाराष्ट्र व गोवा येथून सिलेक्ट झालेत ते बहुतांशी आमच्याच कोर्सचे आहेत.आज जामनगर जयपुर 'त्रिवेन्द्रम हैदराबाद कोट्टक्कल कुन्नुर विजयवाडा उदयपुर व BHU या सर्व ठिकाणी आमच्या कोर्सचे विद्यार्थी आहेत. **2009 या वर्षी आमच्या Student वैशाली आंबेकर या महाराष्ट्र PGA CET मध्ये 'टॉपर' Rank No. 1आहेत**.2008 या वर्षीसुद्धा आमच्या Student प्रियंका तेण्डुलकर या BHU येथे 'टॉपर' Rank No. 1, जामनगर जयपुर Common Entrance मध्ये Rank No. 2 तर महाराष्ट्र PGA CET मध्ये Rank No. 4 आहेत.या प्रकारचे यश पूर्वीही आमचे Student पराग जहागिरदार यांनी मिळवले आहे.एकाच वेळी जामनगर जयपुर BHU या 3 ही Institute मध्ये पराग जहागिरदार सिलेक्ट झाले आहेत.ते आज जळगाव येथे सर्जन आहेत.तसेच BHU येथे गतवर्षी 3, तर जामनगर जयपुर Common Entrance मध्ये 8 Students यशस्वी झालेत. 2009 मध्ये जामनगर येथे 3 विद्यार्थी सिलेक्ट झालेत.पैकी 'माधवी जगताप' या 'टॉपर' आहेत. 2000, 2001 & 2002 या तीनही वर्षी प्रत्येक वेळी 6-6 स्टुडंट जामनगर येथे सिलेक्ट झालेत. आज आमचे काही विद्यार्थी कॉलेजात लेक्चरर आहेत.सचिन चंडालिया.दीपाली कोरडे चंडालिया.अनंत शेकोकार.पियुष गांधी.बालाजी पोटभरे.काही विद्यार्थी Double Gold Medallist आहेत.चेताली भट.स्मिता चोरडिया बोरा.काही विद्यार्थी C–Dac या संस्थेत AyuSoft या Projectमध्ये Group Leader आहेत.शरावती कांबळे.हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

❖ अभ्यासाबरोबरच आणखी काही तयारी लागते ः आर्थिक शारीरिक व मानसिक…

❖ आर्थिक ः महाराष्ट्रात एन्ट्रन्सचा फॉर्म व परीक्षा फी सर्वात महाग म्हणजे रू.2000 पर्यन्त आहे शिवाय परीक्षेच्या केन्द्रापर्यन्तचा प्रवास यासाठी खर्च होतो.तर महाराष्ट्राबाहेर जामनगर जयपुर BHU यांसाठी फॉर्मसाठी अनुक्रमे फक्त रू.1000 आहे.परीक्षा फी वेगळी नाही.बहुतेक सर्व परीक्षांचे फॉर्म आता internet वरून download करता येतात. पण सलगपणे जवळपास 3 आठवडे आडवातिडवा रेल्वेप्रवास आणि लॉजिंग व खाणे व फोन असा खर्च होतो.याशिवाय अन्य परीक्षांसाठी त्या त्यानुसार फॉर्म व प्रवास खर्च होतो. याव्यतिरिक्त झेरॉक्स व पोस्टिंग यांचा खर्च आहे. तांत्रिक ः आवश्यक ती सर्व सर्टिफिकेटस् मार्क शीटस् अटेस्टेड झेरॉक्स फोटो यांची जुळणी आधीच करावी.

❖ शारीरिक ः परीक्षेसाठीच्या अभ्यासाचा काळ व प्रत्यक्ष परीक्षेसाठीचा प्रवास बदलणारे पाणी अन्न वातावरण यांत आरोग्य टिकले पाहिजे.विशेषतः जून अखेरच्या परीक्षा या उन्हाळा पावसाळा संधिकालात होतात.यासाठी सूर्यनमस्कार पाठ मागे वाकणारी आसने योग्य विश्रांती योग्य आहार औषधोपचार घ्यावेत.ऐन परीक्षेच्या वेळी 102 ताप आलेले विद्यार्थी मी पाहिलेत.अभ्यास करताना सलग तास न् तास करू नये.दर 40 मिनीटांनी मानवी बुद्धि सॅच्युरेट' होते.त्यावेळी थोडे थांबावे.विषय चेंज करावा.थोडे इकडेतिकडे हिंडावे.अवांतर वाचावे.गाणे ऐकावे.पण उगीचच 40 पेक्षा अधिक मिनिटे 'रेटू' नये.कारण ते फक्त श्रम होतात.अभ्यास नाही.आपला 'प्राईम टाईम' म्हणजे सर्वाधिक उत्साहाचा काळ दिवसात कोणता असतो त्यावेळी अवघड किचकट विषयाचा अभ्यास करावा.वाचन, नोट्स् काढणे, काय वाचावे काय वाचू नये याचा विवेक करता येणे, MCQ Hunting करणे ही 'कौशल्ये' लिहून सांगता येणार नाहीत.ती 'प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा LIVE TRAINING चा' भाग होत.त्यामुळेच अशा प्रकारच्या 'प्रशिक्षण वर्ग' पोस्टद्वारे लेखी मटेरियल (Correspondence/Postal Course) पाठवून करणे शक्य असले तरी थोडे अवघड आहे.कारण यामध्ये आयुर्वेद नव्याने शिकवायचा नसून साडेचार वर्षाचा प्रचंड आवाका 'तपशीलाने' निवडायचा आहे.म्हणूनच यामध्ये 'कसा How To' अभ्यास करायचा या 'पद्धतीलाच method अधिक महत्त्व' राहते.

❖ मानसिक ः "देऊन बघू परीक्षा.नाहीतर तेवढेच द्वारका सोमनाथ काशी दर्शन करून येऊ" या वृत्तीचा उपयोग नाही.'मी परीक्षा देतोय ते सर्वप्रथम येण्यासाठीच' अशी जिंकण्याची वृत्ती हवी. पॉझिटिव विनिंग ॲम्बिशिअस ॲटिट्यूड.शिवाय ध्यान स्वयंसूचना ऑटो सजेशन करावे.

❖ उपयुक्तता ःमुळात 'एम्.डी.करायचं कशासाठी' याचं स्वतःपुरतं उत्तर शोधावं.काही उद्देश असे … 1.पीजी पदवी असायलाच हवी.प्लेन BAMS ला आता काही स्कोप नाही … 2.जॉब मिळेल.आता त्या त्या सब्जेक्टमध्ये पीजी असल्याशिवाय लेक्चररपद मिळत नाही …3.स्टायपेंड मिळेल.तेवढाच प्रॅक्टीस सुरू किंवा सेटल होताना आधार … 4.ज्ञानात कौशल्यात भर पडेल … 1.ज्यांना नुसता पदवीचा कागद हवाय त्यांनी कुठेही एम्.डी.करावं … 2. ज्यांना जॉब हवाय त्यांनी हे लक्षात घ्यावं की कायचिकित्सा व गायनॅक याचे

ग्रूप सॅच्युरेशन आहे त्यामुळे चटकन् जॉब मिळणे जरा अवघडच.फार्मसी क्षेत्रात काही संधी आहेत पण त्याला मर्यादा आहेत.ॲकॅडमिक क्षेत्रात नॉनक्लिनिकल म्हटल्या जाणाऱ्या विषयात आजही पीजींची संख्या कमी आहे.मुळात त्या विषयासाठी त्याच विषयातला एम्.डी.लेक्चरर हा नियम आता निघाल्याने त्या विषयांतील पीजी पण अलिकडेच सुरू झालेत.विशेषतः शारीर रचना, शारीर क्रिया, स्वस्थ, निदान, संहिता आणि सर्वाधिक दुर्मिळ म्हणजे अगद याबाबत अशी स्थिती आहे.पंचकर्म व मानसरोग या नावाचे पीजी आहेत पण या नावाचे डिपार्टमेन्ट किंवा पेपर नसल्याने त्या विषयांतील पीजींना कुठे सामावायचे हा तांत्रिक प्रश्न आहेच...3.स्टायपेंड ःहा एक आकर्षणाचा मुद्दा असतो.महाराष्ट्रात फक्त पोद्दार (वरळी मुंबई ),नांदेड, नागपुर व उस्मानाबाद येथेच स्टायपेंड दरमहा रू.20000 मिळतो.अन्यत्र नाही. काही ठिकाणी क्लिनिकल विषयांत हाऊसमनशिपद्वारे दरमहा 7500 पर्यन्त मिळतात पण हाऊसमनशिप फक्त सहा महिन्यांकरिताच असते.शिवाय महाराष्ट्रात सर्वत्र शासकीय अनुदानित विनाअनुदानित फी भरावीच लागते.ती ग्रूप आहे.काही ठिकाणी तर ती रू.1 लाख आहे.BAMS ची साडेचार वर्षे आईवडिलांच्या पैशाने शिकल्याने आता पुनः आणखी 3 वर्षे पैसे मागायचे काय हा प्रश्न बहुतेकांना सतावतोच.विशेषतः ज्यांचे BAMS शिक्षण विनाअनुदानित कॉलेजात होते त्यांना.याव्यतिरिक्त एम्.डी.करताना प्रायव्हेट प्रॅक्टीस करता येत नाही.काहीजण तरीही करतात किंवा बाहेर प्रायव्हेट हॉस्पीटल्समध्ये हाऊसमनसिप करतात.फीव्यतिरिक्त थिसिससाठी होणारा पेशंट इव्हिस्टिगेशनसाठी लॅब टेस्ट्स्चा खर्च व ड्रगचा खर्च असतोच.यात पुनः पेशंट ड्रॉपआऊटचा हिशोब वाढतो.जी मुले स्थानिक नसतात परगावाहून शिकायला आलेली असतात त्यांना निवासाचा व खानावळीचाही खर्च असतोच.या तुलनेत महाराष्ट्राबाहेर परिस्थिती याच्या उलट आणि आनंददायी आहे.सरासरी जामनगर व जयपुर येथे रू.25000 तर BHUला रू.40000 ‘दरमहा’ स्टायपेंड मिळतो.अन्य सर्व ठिकाणी प्रायः 5000-7000 स्टायपेंड आहे.शैक्षणिक फी नाही.परीक्षा फी नाही.लॅब टेस्ट्स् व ड्रग यांचा खर्च इन्स्टिट्यूट करते.मग ती टेस्ट किंवा ड्रग कितीही महाग असू दे.होस्टेलमध्ये प्रत्येकाला स्वतंत्र रूम आहेत.त्यांना काडीमात्र फी नाही.लाईट व गरम पाणी 24 तास ‘फुकट’ उपलब्ध.

❖ ज्ञान ः अतिशय वैशिष्ट्यपूर्ण सामुग्री व तंत्रकौशल्ये स्वतःला हाताळायला शिकायला मिळतात.मायक्रोटोम, ल्युसिडा कॅमेरा, UV & GAS क्रोमॅटोग्राफी, ॲनिमल हाऊस, मायक्रोफिल्मिंग युनिट, क्वालिटी कंट्रोल मेडिकल केमिस्ट्री लॅब, अतिप्रचंड समृद्ध लायब्ररी, प्रत्येक विषयाची स्वतंत्र ओपीडी आयपीडी, अनुभवी कुशल स्टाफ.सिनॉप्सिस, थिसिस, ड्रग ट्रायल, सिलेक्शन व ॲसेसमेंट क्रायटेरिया या बाबींतील रिसर्च डॉक्युमेंटेशन कसे करावे याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण.अशा बाबी राष्ट्रीय पीजी सेन्टर्समध्ये शिकण्याजोग्या आहेत.अर्थात् ज्ञान ही प्रत्येकाने स्वतः मिळवायची गोष्ट आहे.पण वातावरण, उपलब्ध सुविधा, आर्थिक सुरक्षितता व शिक्षकांचे स्वतःचे कौशल्य, वृत्ति, अनुभव या बाबींची तुलना करता जामनगर जयपुर BHU त्रिवेंद्रम ही स्थाने सरस आहेत हे निःशंक.ज्यांना तिथे प्रवेश मिळत नाही अशांनी ‘कोल्ह्याला द्राक्षे आंबट’ या न्यायाने काही अपसमज या संस्थांबाबत पसरवले आहेत.ते समज ‘गैर’च आहेत हे मी ठामपणे सांगू इच्छितो.अतिशय संपन्न वारसा व दर्जा या संस्थांना आहे हे निश्चित.आणि ते ‘स्वसंवेद्यच’ आहे.या विधानामागे या क्षणी 4 ही संस्थांत प्रशिक्षण घेत असलेल्या आमच्या 92 हून अधिक विद्यार्थीमित्रांना येत असलेल्या ‘प्रचीती’चे पाठबळ आहे.यापूर्वीही या संस्थामधून 1956पासून प्रशिक्षित असे कितीतरी दिग्गज आदरणीय वैद्यश्रेष्ठ हे त्याचे साक्षीदार आहेत.

❖ अन्य लाभ ः महाराष्ट्राबाहेर एम्.डी.करण्यामध्ये काही तोटे आहेत.ते म्हणजे 3 वर्षे घरापासून दूर राहावे लागते.प्रॅक्टीस 3 वर्षे उशीरा सुरू होते. अर्थात् महाराष्ट्रातही जर स्वतःच्या गावी एम्.डी.इन्स्टिट्यूटला प्रवेश नाही मिळाला तरी हीच परिस्थिती असणार.पण महाराष्ट्राबाहेर जाण्यात इतरही काही लाभ आहेत.वैचारिक पातळी उंचावते.एक वेगळाच आत्मविश्वास येतो.अवघड केसेसकडेसुद्धा धैर्याने व शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची बुद्धीला सवय लागते.1000 दिवस म्हणजे 3 वर्षे आर्थिक निश्चिंततेची मिळत असल्याने युजी’ला केला नसेल इतका मूलगामी व व्यापक अभ्यास होतो.कधीच माहीत नसलेल्या उत्तम पुस्तकांशी परिचय होतो.तीव्र स्पर्धेतून निवड होत असल्याने आसपासच्या सहाध्यायींकडूनही अध्ययनाच्या नव्या प्रेरणा व दिशा मिळतात.त्या त्या प्रांतांतील स्थानिक वैद्यांचा लाभ घेता येतो.विषय मांडण्याच्या शास्त्रीय पद्धती आत्मसात करता येतात.सेमिनार्समुळे व्यासपीठाचे भान येते.आपल्यातल्याच सुप्त गुणांचा आपल्यालाच नव्याने परिचय व विकास होतो.देशभर मित्रसंपर्क प्रस्थापित होतो.नवी भाषा शिकता येते.खर्च अगदी कमी होत असल्याने पैसा साठवता येतो.आंताराष्ट्रीय स्तरांवर परिचय व संधी मिळू शकते.उत्तम फार्मसी किंवा रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये नोकरीची सुवर्णसंधी मिळू शकते.UPSC ची परीक्षा देता येते.Ph.D.करता येतं तेही स्टायपेंडसह.3 वर्षाच्या प्रदीर्घ निवासी सहवासामुळे विश्वासार्ह ‘जीवनसाथी’ मिळण्याची शक्यता असते.

❖ भविष्य ः मुळात महाराष्ट्राबाहेरील संस्थामागे भक्कम शासकीय आर्थिक पाठबळ आहे.त्यामुळे तेथील सुविधा व दर्जा सुधारतच जाणार.किमानपक्षी घसरणार तरी नाही.जामनगर हे भारतातील ‘आद्य’ रिसर्च इन्स्टिट्यूट (1952) व ‘आद्य’ पीजी ट्रेनिंग सेंटर (1956) होय.तसेच ते जगातील ‘एकमेवाद्वितीय’ व ‘आद्य’ आयुर्वेद विश्वविद्यालय (मोनोफॅकल्टी युनिवर्सिटी) होय.येथील धन्वन्तरि मंदिर हे अतिभव्य राजवाडा होय.शिवाय येथील होस्टेल्स, पीजीच्या इमारती, ॲनिमल हाऊस, लायब्ररी हेही प्रेक्षणीय आहे.जयपुर हे 1975 साली स्थापलेले भारताचे ‘एकमेव’ राष्ट्रीय आयुर्वेद संस्थान होय.तर BHU (1963) हे तर ग्रूपच प्रगत केन्द्र होय.सीसीआयएम्च्या नियमांपेक्षाही अधिक सुविधा या 3 ही संस्थांत उपलब्ध आहेत.त्याचप्रमाणे अहमदाबाद आणि ‘त्रिवेन्द्रम कोट्टक्कल व हैदराबाद विजयवाडा उदयपुर ही राज्यस्तरीय पीजी सेन्टर्सही दर्जायुक्त होत.महाराष्ट्रातील पीजी सेन्टर्स ही युजीच्याच सेटअपमध्ये उभी केलेली आहेत.काही सन्माननीय अपवाद वगळता ओपीडी आयपीडी लायब्ररी स्वतंत्र स्टाफ यांची कमतरता आहे.पण त्यात भविष्यात हळूहळू सुधारणा होत जाणारच.म्हणूनच एक नक्की की एन्ट्रन्स द्यावीच द्यावी.मुबलक जागा व राष्ट्रीय स्पर्धा नसल्याने महाराष्ट्रात एम्.डी.करणं तुलनेने ‘चांगलं व सोपं’ आहे.पण फक्त इतकंच की महाराष्ट्रबाहेर काही ठिकाणी एम्.डी.करणं हे ‘अधिक चांगलं’ व थोडं अवघड आहे.कारण जागा कमी व स्पर्धा राष्ट्रस्तरावर आहे.

❖ म्हणून उपरोक्त सर्व मुद्यांचा साकल्याने विचार करून मगच एम्.डी.कुठे करावे याचा निर्णय घ्यावा आणि...

❖ **आपल्या आयुष्याच्या ‘तारूण्यातील’ सुवर्णकाळाची उमेदपूर्ण 3 वर्षे म्हणजे 1000 दिवस आपण यात ‘गुंतवणार’ आहोत हे सर्वात महत्त्वाचे होय.**

❖ यशाची शक्यता ः महाराष्ट्रात एम्.डी.साठी प्रवेश मिळणे तुलनेने सोपे आहे कारण परीक्षा सोपी आहे व मुबलक जागा उपलब्ध आहेत.पण हवे ते किंवा चांगलं कॉलेज, हवा तो किंवा चांगला विषय व हवे ते किंवा चांगले शहर यांचे त्रैराशिक जुळून येईलच याची शाश्वती कशी देणार ? महाराष्ट्राबाहेर मात्र परीक्षा थोडी अवघड व जागा कमी आणि स्पर्धा राष्ट्रीय स्तरावर असे आहे.More the difficulty, more the glory ! And ‘No guts, No GLORY’.मात्र प्रत्येक महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्याने एन्ट्रन्स शक्यतो सर्वच्या सर्व द्याव्यातच.कारण आयुष्यात ही संधी पुनः येत नाही.तेही इंटर्नशिप संपल्या संपल्या द्याव्यात.पुढील वर्षी नीट अभ्यास करून देऊ असा विचार करू नये.कारण मध्ये 1 वर्ष गेल्यानंतर पुनः अभ्यासाचा ‘टेम्पो’ येत नाही.उत्साह जातो.जीवनाचे संदर्भ आणि प्रेफरन्स बदलतात.आर्थिक जबाबदाऱ्या खुणावतात.परीक्षा द्यावीच.सिलेक्ट झालात तर ॲडमिशन घ्यायची की नाही हे तुम्ही ठरवू शकता पण परीक्षा दिलीच नाहीतर मग सिलेक्ट होण्याचाच प्रश्न नाही.मग तुम्ही स्वतःच्या नशीबाची दारे का बंद करताय ? **‘ लक्ष्मी तिलक लगाने आ रही है और आप है कि मुॅह धोने की बात कर है ’** असं होऊ नये. परीक्षा जून एण्डला असल्याने इंटर्नशिप संपलेवर 6 महिन्यांचा कालावधी अभ्यासासाठी असतो.आणि सर्वच्या सर्व एन्ट्रन्स मात्र नक्की द्याव्यातच.कारण यश मिळाले तर उत्तमच पण नाही मिळाले तरी त्याचा अनुभव मार्गदर्शक म्हणून उपयोगी ठरतो व आपण किती पाण्यात आहोत ते उमगते.न जाणो, देव कोणते दार तुमच्या भाग्योदयासाठी उघडेल ! हे पहा, तुम्ही परीक्षा नाही दिलीत तरी कुणीतरी सिलेक्ट होणारच, मग ‘मी का नाही’ हा विचार करावा.अभ्यासाचा कालावधी पूर्ण समर्पितवृत्तीने full dedicated वापरावा. या काळात शक्यतो हाऊसमनशिप लोकम अशा तात्कालिक अर्थमोहात पडू नये.कारण सिलेक्ट झालात तर यापेक्षा कितीतरी जास्त स्टायपेंड मिळतो व नाही झालात तर केव्हाही ते पर्याय उपलब्ध असतातच मात्र त्यासाठी अभ्यासाचा महत्त्वपूर्ण काळ वाया घालवू नये. कारण 8 तास हाऊसमनची ड्यूटी केल्यावर अभ्यासाचा दर्जा काय राहील ? अभ्यास करतानाही तारतम्य बाळगावे.जागरणे टाळावीत.अभ्यासात स्पर्धा स्वतःशी ठेवावी.दुसऱ्याशी नाही.अभ्यासाच्या लांबीरूंदीपेक्षा त्याचा दर्जा महत्त्वाचा.फक्त 12 दिवस अभ्यास करून ‘टॉपर’ आलेले पाहिलेत.एकाच वेळी तीनही इन्स्टिट्यूटला ‘टॉपर’ आलेले पाहिलेत.एकाच वेळी एकाच इन्स्टिट्यूटला अर्धा डझनपेक्षा जास्त विद्यार्थी महाराष्ट्रातून सिलेक्ट होण्याचा इतिहास आहे. म्हणूनच म्हणतो,

“Nothing is IMPossible, bcoz the word ‘IMPossible’ itself says,.. “~~IMPossible?~~ **I M Possible** !!!!”

… *Therefore*, **B Ambitious! B Positive!! … And B the WINNER!!!!**

Introducing NEW ‘**Live Test Series**’ : 90 Papers of 250 MCQs each daily, 10am to 1pm
from **01March to 31 May 2012**. Available in **PUNE** only.
*Mobile*: 9422016871 *email:* MhetreAyurved@yahoo.co.in ; *website:* www.MhetreAyurved.com

Introducing NEW ‘**Live Test Series**’ : 90 Papers of 250 MCQs each daily, 10am to 1pm
from **01March to 31 May 2012**. Available in **PUNE** only.
*Mobile*: 9422016871 *email:* MhetreAyurved@yahoo.co.in ; *website:* www.MhetreAyurved.com

Introducing NEW ‘**Live Test Series**’ : 90 Papers of 250 MCQs each daily, 10am to 1pm
from **01March to 31 May 2012**. Available in **PUNE** only.
*Mobile*: 9422016871 *email:* MhetreAyurved@yahoo.co.in ; *website:* www.MhetreAyurved.com

- Introducing NEW ‘**Live Test Series**’ : 90 Papers of 250 MCQs each, DAILY, 10am to 1pm
from **01 March to 31 May 2012**. Available in **PUNE** only.

MhetreAyurved@yahoo.co.in MhetreAyurved@gmail.com www.MhetreAyurved.com

*Mobile*: 9422016871